# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विद्यापीठातील सर्व अधिविभाग, प्रशासकीय विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, सुधारीत आकृतीबंध, नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती, पदोन्नती, इ. कारणांमुळे विद्यापीठातील चतुर्थ श्रेणी 'शिपाई' संवर्गातील कर्मचारी संख्या कमी झालेली आहे. सदर रिक्त झालेल्या पदावर शासन भरतीबंदीमुळे नियमित बदली कर्मचारी देणे शक्य होत नाही. याबाबत प्रशासनामार्फत नियमित पदभरतीच्या अनुषंगाने शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. त्यामुळे सध्या सदर रिक्त पदावर रोजंदारी कर्मचारी देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

तसेच विभागातील चतुर्थ श्रेणी कर्मचारी रजेवर असलेस तात्काळ त्याच दिवशी पर्यायी बदली कर्मचाऱ्यांची मागणी केली जाते. त्यामुळे प्रशासनास पर्यायी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात अडचणी निर्माण होतात.

तेव्हा येथून पुढे कर्मचारी रजेवर जाणेपूर्वी किमान तीन दिवस अगोदर पर्यायी मनुष्यबळाबाबत मागणी सोबतच्या विहीत नमुन्यात आस्थापना विभागाकडे करणेत यावी. त्यानंतरच पर्यायी मनुष्यबळ उपलब्ध करून देणेत येईल, याची नोंद घ्यावी.

कुलसचिव

जा.क्र.आस्थापना/ 728

दिनांक : 16 MAR 2018

प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
२. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
३. सर्व उपकुलसचिव, सहाय्यक कुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी व समकक्ष अधिकारी
४. स्वीय सहाय्यक मा.कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, यांना माहितीसाठी.
५. समन्वयक, इंटरनेट सेल - सदरचे परिपत्रक INTRANET वर Registrar Circulars या सदरात प्रसिध्द करावे.

**सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांच्या निदर्शनास आणावे.**

विभागाचे नांवः
दि.

प्रति,
उपकुलसचिव
आस्थापना विभाग
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

**विषयः- बदली रोजंदारी कर्मचारी मिळणेबाबत.**

महोदय,

या विभागाकडील चतुर्थश्रेणी कर्मचारी श्री./श्रीमती ---------------------------------- हुददा ------------------------ हे दि.---------------- ते दि.------------- यादरम्यान एकूण ------- दिवस हक्काच्या/वैद्यकीय/किरकोळ रजेवर आहेत.

तरी विभागाचे कामकाज सुरळीत होणेचे दृष्टीने या विभागास बदली रोजंदारी कर्मचारी उपलब्ध व्हावा.

विभागप्रमुख/अधिविभागप्रमुख

(टीपः- सदर मागणी आस्थापना विभागाकडे किमान तीन दिवस अगोदर करणेत यावी.)